# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई

**(स्वायत्त) (ISO: 9001:2008) (ISO/IEC 27001:2013)**

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: २६४७१२५५ (का.)/२६४७ ०९१६ (वै.) फॅक्स ९१-०२२-२६४७३९८०

Email : director@msbte.com Web : www.msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/का-५०/औ.प्र./२०१८/ 7298 दिनांक: 26 OCT 2018

**महत्वाचे परिपत्रक-**

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी
संलग्नीत संस्था. (AICTE )

विषय: 'I' Scheme अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांकरीता औद्योगिक प्रशिक्षणाच्या (Industrial Training) आयोजनाबाबत....

मंडळाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अखिल भारतील तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त २९ अभ्यासक्रमांकरिता 'I'Scheme अभ्यासक्रम लागू केला आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्य वाढीसाठी चौथ्या सत्रानंतर ज्या अभ्यासक्रमांकरिता ६ आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण (Industrial Training) अनिवार्य करण्यात आलेले आहे त्यासाठी ६ क्रेडीट व १५० गुणांची तरतूद करण्यात आलेली आहे. संस्थेने सदर प्रशिक्षणाचे आयोजन चौथ्या सत्राच्या लेखी परिक्षेनंतर करावयाचे आहे.

अश्याप्रकारचे अनिवार्य प्रशिक्षण प्रथमच आयोजित करण्यात येणार असून सदर प्रशिक्षण संस्थामार्फत आयोजित करण्याबाबत नियोजन करावयाचे आहे. साधारणपणे मे २०१९ च्या दुस-या आठवड्यापासून ते जून २०१९ च्या तिस-या आठवड्यापर्यंत प्रशिक्षण करणे अपेक्षित आहे. संस्थांनी याबाबत नजीकच्या उद्योगधंद्यासोबत संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या Placement बाबत उद्योगधंद्यांची सहमती घेणे आवश्यक आहे.

सदर प्रशिक्षणाचे आयोजन सुलभ व यशस्वी होण्याकरिता शासनाचे विभाग व उपक्रमांमध्ये सुध्दा सदर प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत निर्देशित करण्याकरिता मंडळाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करुन पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने उपसचिव, तंत्रशिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी दि. ७.८.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या संबंधित विभाग व उपक्रमांना सदर प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत सहकार्य करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर पत्रांच्या प्रती मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध आहेत.

औद्योगिक प्रशिक्षणाचे यशस्वीरित्या आयोजनाबाबत मंडळाच्या दि. ८.८.२०१८ रोजी झालेल्या विद्वत समितीच्या (Academic Committee) बैठकीमध्ये ठरविल्या नुसार जिल्हा, विभाग व राज्यपातळीवर त्रिस्तरीय समित्या स्थापन करावयाच्या असून औद्योगिक प्रशिक्षणाचे आयोजन HUB & SPOKE धर्तीवर करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरीय समिती व विभागीय समितीची माहिती तंत्र शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयात उपलब्ध आहेत. त्यानुसार सर्व संबंधितांमार्फत कार्यवाही करण्याकरिता निर्देश मंडळाच्या विभागीय कार्यालयांना देण्यात आलेले आहेत. त्याकरिता विभागीय कार्यालयांनी जिल्हानिहाय HUB Institute व HUB Industry ची निवड केलेली आहे.

औद्योगिक प्रशिक्षणाचे यशस्विरित्या आयोजन होणे करिता संस्थास्तरावर खालील प्रमाणे

कार्यक्रम राबविण्यात यावा.

| S.N | Activity | Schedule |
|---|---|---|
| 1 | Collecting information about Industry/Organization available for training along with capacity. | Upto 15th December 2018 |
| 2 | Submission of information of Industry / Organization available for training along with capacity and its confirmation. | Through Online Upto 15th December 2018 |
| 3 | Student & mentor allocation as per the slots available for Industrial training. (Desirable mentor student ratio is 1:15) | Upto 31st December 2018 |
| 4 | Obtaining consent letter from parents/guardian. | Upto 15th Jan 2019 |
| 5 | Student enrollment for Industrial training.(Mapping) | Upto 31st Jan 2019 |
| 6 | Issue letter to the Industry/Organization for the training along with detail of students & mentors. | Upto 28th Feb 2019 |
| 7 | Mentors to carry out progressive assessment of the students during the Industrial training. | Each week of Training |
| 8 | Training assessment by mentor along with Industry / organization expert as external examiner. | Within two weeks after completion of Training. |
| 9 | Submission of marks of Industrial training | At the end of fifth sem. when on-line e-marksheet link is available |

मंडळाच्या website वर Important Link मध्ये उपलब्ध I Scheme Implementation tabs वर Institute Login मध्ये Industry registration form उपलब्ध आहे. सदर Formची Print घेऊन आपल्या परिसरातील Industries/Service Centers/ शासकीय कार्यालये / निमशासकीय कार्यालये / खाजगी उद्योगधंदे इत्यादी, ज्यामध्ये विद्यार्थी सहा आठवड्यांचे Industrial Training घेऊ शकतील त्यांची माहीती भरुन घ्यावी. सदर Industry Registration form संस्थांनी मंडळाच्या website वर त्यांच्या Login द्वारे Online upload करावेत.

Industrial Training चे आयोजन करण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील. Training आयोजनाबाबत काही अडचणी असल्यास त्यांच्या जिल्हास्तरीय Industrial Training Committee, Hub Institute, Hub Industry व मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा. संस्था प्रमुखांनी सर्व विद्यार्थ्यांचे Industrial Training करिता Placement आयोजन केल्याची खात्री झाल्यानंतर, त्याबाबतचे संस्थेच्या Letter head वर प्रमाणपत्र मंडळाच्या website वर scan करुन upload करावे.

मंडळामार्फत 'I 'Scheme मध्ये प्रविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या Micro-project व Industrial Training च्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वे व मुल्यांकन पध्दत 'Micro Project &Industrial Training Assessment Manual' द्वारे या सत्रापासून उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर manual मध्ये Industry Registration form, पालकांचे संमती पत्र, mentor allocation व मुल्यांकन formats इत्यादी समाविष्ट करण्यात आलेले आहेत. वेगवेगळ्या संस्थांकडून एकाच Industry चे वारंवार registration होऊ नये म्हणून Industry Registration ला विभागीय कार्यालया द्वारे validate करण्यात येईल.

सर्व संबंधीत संस्थाप्रमुखांना 'I'Scheme अभ्यासक्रमामधिल विद्यार्थ्यांकरिता औद्योगीक प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनाबाबत उपरोक्त नुसार कार्यवाही करण्याकरिता निर्देशीत करण्यात येत आहे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रत माहिती व उचित कार्यवाहीकरिता :

उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर, औरंगाबाद, पुणे व मुंबई.